सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740



केंद्र सरकारने वक़्फ़ बोर्ड़चा काळा कायदा करुन देशातील तमाम मुस्लिम बांधवांचा धार्मिक स्वातंत्र्य हिस्कावून घेण्याचा तसेच संविधान बदलण्याचा प्रयत्न केला आहे या काळ्या कायदयाच्या निषेधार्थ आज जालना येथे निषेध सभा आयोजित करण्यात आली होती ! सभेतील प्रचंड जनसमुदाय!! निसार पटेल (मा.उपसभापती अंबड)

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - १७१ | रविवार, दि.२९ जुन २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 171 | Sunday, Dt.29 June 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

# बीड जिल्हा रूग्णालय उपचार नव्हे यातना देण्याचे केंद्र !

## रूग्णाच्या पायात क्रू न लावताच बसविला रॉड ; असह्य वेदनेने रूग्णाचे हाल
## बेफिकीर डॉक्टरांवर जिल्हा शल्यचिकित्सक कारवाई करणार का?





### बेफिकीर डॉक्टरांना निलंबीत करा

सरकारी पैशातून रुग्णालय चालते, तिथे उपचाराच्या नावाखाली हे असे लुटमारीसारखे आणि रूग्णाच्या जिवाशी खेळण्याच काम का सुरू आहे? सरकारी रुग्णालयातील डॉक्टर इतके बेफिकीर कसे बनले आहेत आणि अशा डॉक्टरांवर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत कारवाई करणार आहेत की नाही असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खरे तर अशा दोषी डॉक्टरांना निलंबित करण्याची कारवाई होण्याची गरज आहे.

### आमदारांचीही उदासीनता

यात आणखी एक गंभीर बाब म्हणजे प्रभाळे कुटुंबीयांनी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकार सांगितला. मात्र आमदारांनी बघतो असे म्हणून फोन ठेवला आणि त्यानंतर काहीच दखल घेतली नाही. आमदार हे लोकप्रतिनिधी आहेत. शासकिय दवाखान्यातच जर रूग्णाच्या जिवाशी खेळले जात असेल तर याकडे आमदारांनी लक्ष देण्याची गरज आहे. हे संपुर्ण प्रकरण माहित झाल्यानंतर तरी आमदारांनी दखल घ्यायला हवी होती.






**विश्वनायक न्यूज**

कोणत्याही ठिकाणच्या जिल्हा रूग्णालयाकडे गोरगरिबांसाठी उपचाराचे हक्काचे ठिकाण म्हणून बघितले जाते. शासनाकडून यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला जातो. गरिब आणि गरजवंतांना वेळेवर मोफत उपचार मिळावेत असा शासनाचा उद्देश आहे. मात्र बीड येथील जिल्हा रूग्णालयात शासनाच्या या उद्देशाला हरताळ फासण्याचे काम सुरू असल्याचे दिसत आहे. हा दवाखाना म्हणजे उपचाराचे नाहीतर यातना देण्याचे ठिकाण बनले आहे. दोन दिवसांपूर्वी अत्यंत गंभीर प्रकार या रूग्णालयात घडला आहे. अपघातग्रस्त रुग्णाच्या पायातील फ्रॅक्चर शस्त्रक्रिया करूनही जसेच्या तसे राहिल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. शस्त्रक्रिया करताना संबंधीत डॉक्टरांनी रॉड टाकला मात्र त्याला क्रू टाकलेच नाही अशी चर्चा आहे. परिणामी रूग्णाला याच्या प्रचंड वेदना होवू लागल्या. दुसऱ्यांदा एक्सरे काढल्यानंतर ही बाब लक्षात आली असून, आता या रूग्णावर पुन्हा शस्त्रक्रिया केली जाणार आहे. मात्र अशा बेफिकीर, बेजबाबदार डॉक्टरांवर कारवाई होणार की नाही? हा प्रश्न आता जनतेतून आणि रुग्ण परिवारातून विचारला जात आहे.या बाबत दै.विश्वनायकला मिळालेल्या माहितीनुसार, निपाणी जवळका (ता. गेवराई) येथील भाऊसाहेब नारायण प्रभाळे हे काही दिवसांपूर्वी मोटारसायकल अपघातात गंभीर जखमी झाले. यात त्यांचा उजवा पाय आणि उजवा हात मोडला. बीड जिल्हा रुग्णालयातील वार्ड क्रमांक ५० मध्ये दाखल करून त्यांच्यावर २६ जून २०२५ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया अस्थिरोगतज्ञ डॉ. अनिल भिसे आणि डॉ. विशाल गायके या दोन डॉक्टरांनी केल्याची माहिती रूग्णांनी दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार पायात रॉड टाकून हाड नीट केले गेले. मात्र या ऑपरेशननंतर रुग्णाला असह्य वेदना होऊ लागल्या. यामुळे २८ जून रोजी पुन्हा एक्सरे करण्यात आला आणि खळबळजनक बाब पुढे आली. पायातील फ्रॅक्चर ऑपरेशन करूनही तसेच राहिलेले दिसले. म्हणजेच रॉड टाकल्यानंतरही हाड व्यवस्थित जुळलेलेच नव्हते. पायात नुसताच रॉड टाकरण्यात आला त्याला क्रू बसवलेच गेले नाही अशी चर्चा जिल्हा रूग्णालयात होत आहे. या धक्कादायक निष्कर्षानंतर डॉक्टरांनी रुग्णाला सांगितले की, ३० जून रोजी पुन्हा शस्त्रक्रिया करू. अशा प्रकारे जिल्हा रुग्णालयात 'शस्त्रक्रियाऋच्या नावाखाली नुसता तमाशा चालू आहे का, असा सवाल उपस्थित झाला आहे. एवढी मोठी चूक करून आता दुसऱ्यांदा ऑपरेशन करायचे म्हणजे याठिकाणी रूग्णाच्या जीवाचा खेळ मांडलाय जातोय का?



### दुसऱ्या घटनेत वृद्ध वारकऱ्यास ब्रदरची बेदम मारहाण

छातीत दुखू लागल्याने दिंडीतील एका ७० वर्षीय वारकऱ्याला शनिवारी रात्री जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज रविवारी सकाळी सदरील वारकऱ्याने गोळीसाठी ब्रदरला झोपेतून उठविले. याचा राग मनात धरून सदरील ब्रदरने या वारकऱ्यास सर्वांसमोर बेदम मारहाण करून एक हजार सहाशे रुपये हिसकावून घेतले अशी महीती अश्रुबा सोनवणे यांनी दिली. यामुळे या रूग्णालयावर कोणाचे नियंत्रण आहे का नाही, असा सवाल उपस्थित झाला आहे.अश्रुबा सोनवणे नावाचे बारामती येथील ७० वर्षीय वारकरी हे पैठण येथील दिंडीत सहभागी होवून पंढरपूरकडे चालले होते. दिंडी पैठणहुन मांजरसुंबा येथे थांबली असता, सोनवणे यांना चेसपेन झाल्यामुळे त्यांना शनिवार रोजी जिल्हा रूग्णालयातील फेवर नावाच्या वार्ड मध्ये दाखल करण्यात आले. सदरील रूग्ण वारकऱ्याने रविवारी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान फेवर वार्ड मधील वैभव लोहार नावाच्या ब्रदरला झोपेतून उठवून गोळी मागितली. मात्र झोपेतून उठविणल्याचा राग धरून मद्यपान केलेल्या वैभव लोहार नावाच्या ब्रदरने वारकरी रूग्णाला बेदम मारहाण केली. मारहाण झाल्यानंतर तक्रार देण्यासाठी सदरील वारकरी पोलिस स्टेशन सोधत होता. त्यानी बीड शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. या कर्मचाऱ्यावर कारवाई केली जाणार की नाही याकडे लक्ष लागले आहे.



## बालेपीर भागातील रस्त्याची दैना दूर खमरोद्दीन यांनी व्यक्त केली कृतज्ञता

बीड ।प्रतिनिधी

आ. संदीप क्षीरसागर व माजी आ. सय्यद सलीम बीड शहरातील विविध विकास कामाचा पाहणीसाठी बाले पीर परिसरात आले असता कॉंग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष मोहम्मद खमरुद्दीन यांनी चाऊस गल्ली आदित्य नगर बिलाल मस्जिद अजमेर नगर परिसरातील रस्ते व नाल्या ची झालेली दयनीय अवस्था दूर करण्याची मागणी केली असता या प्रश्नानाची सोडवणूक करण्यात आल्याने मोहम्मद खमरुद्दीन यांनी बालेपीर येथील नागरिकाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली आ. संदीप शिरसागर व मा आ. सय्यद सलीम यांच्या दूरदृष्टीतून बीड शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या जिव्हाळ्याच्या प्रश्नानाकडे लक्ष देऊन सोडवणूक करण्यासाठी लक्ष देत आहे बाले पीर परिसरातील एकनाथ नगर अमराई अमन पार्क पूर्व वार्ड क्रमांक ११ भागातील रस्ते व नाल्याची अत्यंत दयनिय अवस्था झाल्याची मागणी त्यांच्याकडे करण्यात आली असता बाले पीर येथील जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे आमदार संदीप क्षीरसागर व मा आ सय्यद सलीम यांनी सोडवणूक करून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्याने नागरिकाकडून आनंद व्यक्त होत असल्याने आजी-माजी आमदाराचे खमरोद्दिन यांनी नागरिकच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली




बीड जिल्हा परिषदेचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी मा . जितीन रहेमान यांच्या सत्कारा वेळी उपस्थित अनिल जाधवर - राज्य अध्यक्ष, राज्य उपाध्यक्ष - प्रकाश अहिरे, भाऊसाहेब हंगे, मच्छिंद्र राख, बीड जिल्हाध्यक्ष : द . ल वारे, सचिव - हकिम मनियार, कोषाध्यक्ष - संजय दराडे, उपाध्यक्ष : भाऊसाहेब मिसाळ, सुर्यकांत शिंदे, अनिल गोल्हार, सोमनाथ तांदळे, अन्वर खान हे उपस्थित होते .

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनानिमित्त सामाजिक न्याय भवन बीड येथे
# मोठ्या आनंदाच्या वातावरणामध्ये व उत्साहाच्या वातावरणामध्ये कार्यक्रम संपन्न झाला

बीड ।प्रतिनिधी

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमासाठी मा.संजीव जाधव(जि.जा.प्र.प.स बीड), मा. उमेश सोनवणे (उपायुक्त जि.जा.प्र.प.स बीड) मा.दत्तात्रय क्षीरसागर सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड) मा. मनीषा बोराडे ( जिल्हा व्यस्थापक बीड) उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून झाली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला शासकीय निवासी शाळा शिरूर येथील माजी विद्यार्थी गायक प्रमोद निकाळजे याने शाहू महाराज यांच्यावर आधारित गीत गाऊन उपस्थिताची दाद मिळविली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्रदीप भोगले सर यांनी केले त्यानंतर शासकीय निवासी शाळा व शासकीय वसतिगृह येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे वक्ते मा. सोनवणे सर यांनी राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य यावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा.उमेश सोनवणे उपायुक्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच अध्यक्षीय भाषण मा.संजीव जाधव अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड यांनी केले.माझी शाळा सुंदर शाळा/ डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रविण्य पुरस्कार शाळेस प्राप्त झाल्याबद्दल मुख्याध्यापिका अस्मिता जावळे यांचा सर्व मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात





आला तो त्यांच्या प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत सर्व मान्यवरांनी समाधान व्यक्त केले व त्यांच्या पुढील प्रशासकीय कर्तव्यास सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम.अस्मिता जावळे यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री.विनोद वराट यांनी केले तो सध्या बीड जिल्हा आयुक्त समाज कल्याण विभागाला अतिशय पारदर्शक प्रशासकीय कर्तव्य बजावणारे प्रशासनातला मोठा गाडा अभ्यास असलेले आणि अतिशय जनहिताचे आणि विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनीच्या हिताचे सकारात्मक विचार करून विद्यार्थ्यांना शासनाकडून शैक्षणिक वाटचालीसाठी आर्थिक मदत मिळवून देण्यामध्ये सातत्याने प्रयत्न करणारे असे कर्तव्यदक्ष सहाय्यक आयुक्त म्हणून बीड जिल्ह्याला लाभलेले

मा. श्री प्रदीप भोगले सर सहायक आयुक्त बीड यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभागातील वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक सर्वत्र बीड जिल्ह्यामध्ये आपल्या उत्कृष्ट प्रशासकीय कर्तव्याच्या माध्यमातून लोकांच्या मनामध्ये विद्यार्थ्यांच्या मनामध्ये एक आगळे वेगळे आपले स्थान निर्माण करणाऱ्या अशा सर्वत्र लेडीज सिंघम म्हणून परिचित असलेल्या श्रीमती कविता असराजी गायकवाड मॅडम यांच्या कुशल निवेजातून हा मोठ्या उत्साहामध्ये सर्व विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी येथे उपस्थित असलेल्या बीड येथील गृहपाल अमिता जाधव मॅडम तसेच गायकवाड मॅडम सुरज हनवते सर नितीन पवार सर नितीन राठोड सर नितीन पतंगे सर घुले सर कुलकर्णी सर तसेच या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी शेख सर सह आदी उपस्थित होते सहायक आयुक्त कार्यालयातील सर्व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोठे परिश्रम घेतले व आयुक्त प्रदीप भोगले सर यांनी या कर्मचाऱ्यांच्या कार्याच्या बाबतीत या कार्यक्रमाच्या बाबतीत समाधान व्यक्त केले . व हा कार्यक्रम मोठा उत्साहात यशस्वीरित्या संपन्न झाला .

सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



# विद्यार्थिनींचा लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी शिक्षक विजय पवारला राजकीय पाठबळ-डॉ.योगेश क्षीरसागर



बीड /प्रतिनिधी:-नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी शिक्षक विजय पवारला राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड असून, घटनेनंतर रात्री आमदारांच्या घरी जाऊन संबंधित यंत्रणांना फोन केले गेले. इतक्या गंभीर गुन्ह्यात आरोपी फरार राहतो, यामागे कोणाचा दबाव आहे का, याचा तपास झाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात पवार यांचा दबदबा असून, याआड अनेक आर्थिक गैरव्यवहार झाले असल्याचा आरोपही डॉ.क्षीरसागर यांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून पीडितेला न्याय द्यावा. तसेच, सोमवारी बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला असून सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागर यांचा निकटवर्तीय आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो लोकप्रतिनिधीच्या घरी गेला आणि त्यानंतर फरार झाला, असे सांगत यंत्रणेवर दबाव टाकला गेला का, याची चौकशी करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. शिक्षण क्षेत्रात पवारचा दबदबा असून, याआड आर्थिक गैरव्यवहार, जमीन घोटाळे व क्लासेस चालक व विद्यार्थ्यांना त्रास देण्याचे प्रकार घडले आहेत. या घटनेमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, बीडमध्ये शनिवारी शैक्षणिक बंद पाळण्यात आला. सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा बंदमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ.क्षीरसागर यांनी केले. पीडित मुलगी मानसिकदृष्ट्या खचली असून, तिच्या कुटुंबीयांनी पुढे येऊन आवाज उठवावा, तसेच हा लढा सर्वांचा व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी स्वतः पुढाकार घेणार असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

राजकारण बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आवाहन

पोलीस अधीक्षकांकडून तसेच पीडितेच्या कुटुंबियांकडून माहिती घेतली असून, संपूर्ण प्रकरण पालकमंत्र्यांसमोर मांडले जाणार आहे. पवारचे सीडीआर तपासणे, सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेणे आणि आरोपीवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे डॉ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. राजकारण बाजूला ठेवून आरोपीला वाचवण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये, यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.



बीड जिल्हा परिषदेचे सन्माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान सर यांनी बीड जिल्हा परिषदेचा मा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा मनस्वी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना महाराष्ट्रामध्ये सर्वात अग्रेसर असलेल्या लोकांच्या सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारा असा महाराष्ट्र राज्य लोकशाही संघ या पत्रकार संघाचे मा श्री संस्थापक अध्यक्ष मा श्री भागवत जी वैद्य साहेब यांनी जितीन रहमान सर यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय कर्तव्य बजावत असलेल्या प्रशासकीय कर्तव्य कार्याचे कौतुक करून व लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने समाधान व्यक्त करून त्यांना पुढील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून होणाऱ्या प्रशासकीय कर्तव्यास मनस्वी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन मनस्वी शुभेच्छा दिल्या या वेळी उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे सचिव माननीय श्री सुनील जी दादा महा कुंडे साहेब सह संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर दैनिक न्याय टाइम्स बीड तथा संघटक महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघ मुंबई प्रदेश शाखा बीड जिल्हा सह लोकशाही पत्रकार संघाचे बीड शहराध्यक्ष गणेश राव सह आदी मान्यवर उपस्थित होते.



**बीड ।प्रतिनिधी**

**उमाकिरण शैक्षणिक संकुल येथे खाजगी क्लासेस च्या नावाखाली चालू असलेल्या घाणेरड्या कृत्याचा निषेध व्यक्त करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांना आरोपी नराधम विजय पवार व खटावकर यांना दोन दिवसात तात्काळ अटक करा. नसता १ जुलै रोजी जिल्हा पोलीस अधीक्षिक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार अशा स्वरूपाचे निवेदन देण्यात आले होते. अखेर मनसेच्या मागणीला यश आरोपी विजय पवार व खटावकरला दोन दिवसात पोलीस प्रशासनाने अटक केले.पोलीस प्रशासनाचे अभिनंदन..**

# बीड शहरातील स्विमिंग पूल दुर्घटनेत तरुणाचा मृत्यू; ऑल इंडिया पँथर सेनेची कारवाईची मागणी

बीड ।प्रतिनिधी

शहरातील जिल्हा स्टेडियम येथील स्विमिंग पूलमध्ये १२ एप्रिल २०२५ रोजी घडलेल्या दुर्दैवी घटनेत सतीश कांबळे या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी बीड शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ०८/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यूचा गुन्हा दाखल आहे. मात्र, या प्रकरणातील तपासात प्रगती नसल्याचा आरोप करत ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ते व जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी तात्काळ कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

घटनेचा तपशील : दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सतीश कांबळे हा त्याचे मित्र पवन धनंजय मुंडे, रोहित विजयकुमार जगताप आणि सूरज हनुमंत सूर्यवंशी यांच्यासह स्विमिंग पूलमध्ये पोहण्यासाठी गेला होता. सतीशला पोहता येत नसल्याने तो पाण्यात बुडाला आणि त्याचा मृत्यू झाला. फिर्यादी राजकुमार भिमराव कांबळे यांनी दिलेल्या खबरीनुसार, स्विमिंग पूलच्या मालकाने आणि जीवरक्षक दलाने जबाबदारीने काम न केल्याने ही दुर्घटना घडली. तसेच, सतीश हा शासकीय तंत्रनिकेतन कॉलेजच्या वसतिगृहातून विनापरवानगी बाहेर कसा गेला, याचीही चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

आरोप आणि मागण्या : नितीन सोनवणे यांनी या प्रकरणात स्विमिंग पूलच्या मालकावर आणि जीवरक्षक दलावर निष्काळजीपणा आणि बेजबाबदारपणाचा ठपका ठेवला आहे. त्यांच्या मते, जीवरक्षक दलाने आवश्यक वेळी उपस्थित राहून सतीशचा जीव वाचवण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. तसेच, स्विमिंग पूलच्या मालकाने जबाबदार जीवरक्षक नेमण्यात हलगर्जीपणा केला, ज्यामुळे सतीशच्या मृत्यूस कारणीभूत ठरले. यामुळे संबंधितांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करावे, अशी मागणी सोनवणे यांनी केली आहे.



पोलीस तपासावर प्रश्नचिन्हे :
सोनवणे यांनी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना २७ ऑगस्ट २०२५ रोजी निवेदन सादर करत तपासाच्या प्रगतीवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, तपास योग्य दिशेने होत नसल्याने मृत सतीशला न्याय मिळण्यास विलंब होत आहे. यासंदर्भात त्यांनी पोलीस अधीक्षकांना तात्काळ लक्ष घालण्याची विनंती केली आहे. तसेच, जर प्रकरण मार्गी लागले नाही, तर उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

रस्ता रोकोचा इशारा : ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने नितीन सोनवणे, राहुल जाधव, आकाश गायकवाड आकाश औसरमल आणि इतर कार्यकर्त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, जर तात्काळ कारवाई झाली नाही, तर नेशनल हायवेवर रस्ता रोको आंदोलन केले जाईल. प्रशासनाने याची नोंद घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

समाजात संदेश : नितीन सोनवणे यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कडक कारवाई आवश्यक आहे. मृत सतीशला न्याय मिळावा आणि गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, यासाठी ऑल इंडिया पँथर सेना कटिबद्ध आहे.

प्रशासनाची भूमिका : बीड पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस निरीक्षक (पो.नि.) यांच्या आदेशानुसार चौकशी सुरू आहे. मात्र, तपासाच्या प्रगतीबाबत अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नाही. पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे या प्रकरणात लक्ष घालण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.या घटनेने बीड शहरात खळबळ माजली असून, समाजात अशा दुर्घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजनांची गरज असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

# शिक्षणासाठी झक्छ कंपनीचे मोलाचे सहकार्य विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करुन

## पाटोदा तालुक्यापुढे दिला एक प्रेरणादायी संदेश

पाटोदा ।फयाज सय्यद

जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा पाटोदा येथे सामाजिक बांधिलकीचे अप्रतिम उदाहरण पाहायला मिळाले. प्रदिप हनुमंत नारायणकर कंपनीकडून विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाचे आयोजन करण्यात आले, ज्यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि शिक्षणात सुधारणा घडवून आणणे हा आहे. अनेक गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य खरेदी करणे कधी कधी आव्हान ठरते, त्यामुळे अशा उपक्रमांनी मोठ्या प्रमाणावर मदत होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विषयानुसार वह्या, दुरेघी व चाररेघी वह्या, बॉक्सची वही, कंपास, ड्रॉइंग ची वही, रंगांचे बॉक्स, लाल व निळा पेन अशा अनेक उपयोगी साहित्याचा वाटप करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लाट पाहायला मिळाली, तसेच त्यांच्या मनात शिक्षणासाठी नवचैतन्य जागृत झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पाटोदा नगराध्यक्षा सौ. दिपाली राजूभैय्या जाधव होत्या. त्यांनी आपल्या भाषणात या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत, अशा सहकार्यामुळेच समाजाचा विकास होतो असे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा पोलिस स्टेशनचे पि.आय. सोमनाथ सर, पठाण सर, तसेच प्रदिप हनुमंत नारायणकर, पालक प्रतिनिधी दिलीप जावळे, दिव्यांग प्रतिनिधी संतोष गाडेकर, तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.शाळेचे मुख्याध्यापक बांगर जयराम सर यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि सामाजिक विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्व सांगितले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या हातात शिक्षणाचे साहित्य मिळणे म्हणजे त्यांच्या भविष्याची उजळणी करणे होय. सुरेखा खेडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रस्ताविक व आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी झक्छ कंपनीचे प्रतिनिधी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या गरजा जाणून घेतल्या आणि भविष्यातही अशा प्रकारच्या सामाजिक उपक्रमात सहभाग घेण्याचे आश्वासन दिले.या उपक्रमामागील सामाजिक संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे – विद्यार्थ्यांच्या भविष्याचा पाया शिक्षणाने मजबूत करूया. अशा उपक्रमांमुळे केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर शिक्षक, पालक आणि संपूर्ण समाजाला एकत्र येण्याची प्रेरणा मिळते.या उपक्रमामुळे पालक, शिक्षक व विद्यार्थी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी झक्छ कंपनीचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी या प्रकारच्या उपक्रमांमुळे शिक्षणाचा दर्जा वाढेल आणि समाजाची उन्नती होईल असा विश्वास व्यक्त केला.



# संत भगवानबाबा वारकरी दिंडीसाठी आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

पाटोदा ।फयाज सय्यद

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने २८ जून रोजी संत भगवानबाबा वारकरी दिंडीकरिता आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षपती मा. राजू जाधव, पाटोदा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. अभिषेक जाधव, सभापती श्रीहरी गिते उपस्थित होते. शिबिरात संत भगवानबाबा वारकरी दिंडीत सहभागी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल तांगडे, डॉ. फुलचंद खाडे, डॉ. अतुल जोशी, डॉ. इम्रान शेख, डॉ. पूनम तागड, डॉ. अहिल्या हजारे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. मनिषा गाढवे, प्रा. डॉ. भीमराव राठोड, बाबासाहेब नाईकनवरे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य आबासाहेब हांगे यांनी केला.

## लिंबागणेश परिसरामध्ये अतिशय उत्कृष्ट आपल्या कलेतून अनेक नागरिकांचे घर उभारण्यामध्ये

### एक्सपर्ट असलेले सय्यद अली सय्यद बाबा मिया यांचे दुःखद निधन सर्वत्र होत आहे हळहळ व्यक्त

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश या गावातील अतिशय मनमिळावू स्वभावाचे व सर्वांना आपलेसे करणारे असे तसेच अनेक नागरिकांचे घर बांधण्यामध्ये एक उत्कृष्ट बांधकाम कारागीर म्हणून प्रसिद्ध असलेले असे उत्कृष्ट बांधकाम कारागीर सय्यद अली सय्यद बाबा मिया यांचे लिंबागणेश येथे त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाल्यामुळे सर्व लिंबागणेश



पंचक्रोशी मध्ये शोक कळा पसरली आहे व सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे सय्यद अली सय्यद बाबा मिया यांचे मृत्यू समय वय वर्ष ८० होते ते अतिशय उत्कृष्ट आणि स्वयम ही व्यक्ती म्हणून लिंबागणेश परिसरामध्ये परिचित होते व ते एक उत्कृष्ट बांधकाम कारागीर म्हणून चांगल्या नागरिकांचे या परिसरातील घर उभारण्यामध्ये एक्सपर्ट होते त्यांच्या या निधनामुळे सर्व लिंबागणेश व पंचक्रोशीतून हळहळ व्यक्त होत आहे त्यांच्या आत्म्यास ईश्वर शांती देवो असी सर्वांच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे व सय्यद परिवार यांच्यावर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगरातून सय्यद परिवाराला सावरण्याची शक्ती श्री ईश्वर देव अशी सर्वांच्या वतीने श्री ईश्वराकडे प्रार्थना करण्यात येत आहे सय्यद अली त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी व त्यांचे दोन मुलं व त्यांच्या दोन सुना व त्यांचे नातवंड असा मोठा परिवार आहे

# तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केली ऐतिहासिक कारंजा टॉवरची पाहणी

## एस.एम.युसूफ़ यांनी परिपूर्ण नूतनीकरणासाठी आवश्यक मुद्दे मांडले

बीड ।प्रतिनिधी

वाचन व लेखन प्रिय तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवरला शनिवार दिनांक २८ जून २०२५ रोजी भेट देऊन पाहुणी केली. गेल्या दहा वर्षांपासून कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणाविषयी सातत्याने निवेदन आणि वृत्तपत्रातून लक्ष वेधणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी परिपूर्ण नूतनीकरण व्हावे यासाठी आवश्यक असलेले सर्व मुद्दे तहसीलदार शेळके यांच्यासमोर मांडले. यावेळी तलाठी शब्बीर पठाण, शेख लईख, जहीर शेख, सय्यद सरफराज यांच्यासह इतरांची उपस्थिती होती. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे हे काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहू शकले नाही.

यावेळी तहसीलदार शेळके यांना ऐतिहासिक कारंजा टॉवर विषयी माहिती देताना एस.एम.युसूफ़ म्हणाले की, कारंजा



टॉवर हे १८३८ साली बांधण्यात आलेले आहे. त्याला आता १८७ वर्षे झाली आहेत. अजून १३ वर्ष उलटल्यानंतर ऐतिहासिक कारंजा टॉवरचे द्विशतक पूर्ण होईल. अशा या ऐतिहासिक वास्तूचे जतन, देखभाल, डागडूजी आणि आवश्यक त्या कार्यासाठी जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषद प्रशासन उदासीन आहे. कारंजा टॉवरच्या दुर्दशेविषयी वारंवार निवेदने तसेच प्रसिद्धी माध्यमातून बातम्या देण्यात आलेल्या आहेत. तरीही ऐतिहासिक कारंजा टॉवरचे परिपूर्ण नूतनीकरण केले जात नाहीये. एकीकडे प्रशासनाची अशी अवस्था असताना दुसरीकडे लोकप्रतिनिधी म्हणून बीडचे आमदारही या प्रश्नाकडे लक्ष द्यायला तयार नाही म्हणून आता बीड चे तहसीलदार म्हणून आपण तरी आपल्या पातळीवर ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी जे कार्य होऊ शकते ते करावे असे म्हटले.

यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आश्वस्त करताना म्हटले की, ऐतिहासिक कारंजा टॉवर ही वास्तु बीड शहराची शेकडो वर्षांपासून असलेली ओळख आहे. ही वास्तू सदैव चांगली राहिली पाहिजे. तो आपला इतिहास आहे. आपल्या इतिहासाची साक्ष आहे. याकरिता तहसीलदार म्हणून माझ्याकडून जे काही कार्य होऊ शकते ते मी निश्चित करणार असे म्हटले.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड – ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com